 ISSN:-2347-2723

# परिव्राजक ची भाषाशैली

**प्रशांत गायकवाड**

एम्.ए.एम्.फिल्.नेट, सेट, बी.एड्.
**मराठी विभाग,श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय,**
पेठ वडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.

***सारांश :***

परिव्राजक मधील भाषाशैलीचा विचार करताना बुद्ध तत्त्वज्ञानातील अनात्मवाद, निरीश्वरवाद, विज्ञानवादाचे अधिष्ठान त्याच्या मूळाशी आहे हे ध्यानात घ्यावे लागते. पारंपरिक मूल्यनिकष वजा करूनच मांडणी करावी लागते. कारण फुले-आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य पारंपरिक वैदिक विचारांची उतरंड मोडित काढून रूढ साहित्यभाषेची चौकटसुद्धा नाकारते. पूर्व ग्रहदूषित, वर्णवादी, विषमतामूलक दृष्टिकोन नाकारून मानवकेंद्री मूल्यात्मक दृष्टिकोणातून मांडणी करते. त्यामुळे रूढ भाषेची सहजपणे मोडतोड होते. हे होण्याचे मूळ म्हणजे लेखकाचा जीवनानुभव होय. त्याचेच प्रतिबिंब गौतमीपुत्रांच्या लेखनातही उमटल्याचे दिसते. साहित्याची भाषा या ग्रंथात भालचंद्र नेमाडे म्हणतात, साहित्यिक भाषेत ध्वनी, मात्रा, हेल, शब्दरचना, शब्दक्रम, वाक्यरचना, ओळी, कडवी ह्या सर्वच स्तरावर नवनव्या रचना अपेक्षित असतात. ह्या भाषिक प्रयोगातूनच अर्थाचे नवनवे पदर प्रकट होतात आणि भाषेला पुरोगामी करण्यात साहित्यिकाला यश येते. [१] हे नेमाडेंचे मत गौतमीपुत्र कांबळे यांच्या परिव्राजक मधील भाषेबाबत ग्राह्य वाटते.

**प्रस्तावना :**

'परिव्राजक' या कथासंग्रहात प्रथमपुरूषी निवेदन, तृतीयपुरूषी निवेदन अशा दोन्ही पातळयांवरून निवेदकाने निवेदन केल्याचे दिसते. व्यक्तिरेखांची ओळख व घटनाप्रसंगांचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे निवेदनाच्या माध्यमातून मांडल्याने कथेला एक वेगळी उंची प्राप्त होते. व्यक्तिरेखांच्या बाह्यांगाबरोबरच त्यांच्या अंतरंगातील भाव[1]भावना, त्यांची मूल्यदृष्टी, दृष्टिकोन निवेदनाच्या माध्यमातून चित्रित केला आहे. "आता एकेक घर हवेत तरंगायला लागतंय काय किंवा अवघं विरूपनगरच आकाशात पोहायला लागतय काय? असं वाटायला लागलेलं"[२] किंवा "नृत्यकलेसंबंधी बोलताना तर त्यांचे शब्द प्रत्यक्षात नृत्यच करीत आहेत असं वाटत होतं."[३] या उदाहरणावरून घटना[1]प्रसंगांचे चित्रमय रेखाटन हा एक कथाकाराच्या कथालेखनाचा विशेष असल्याचे जाणवते.

संवादाचा विचार करताना पात्रांची मते, जीवनप्रणाली, दृष्टिकोन, त्यांच्यावरील तत्त्वज्ञानाचा प्रभाव, घटना-प्रसंगानुसार संवादाचे स्वरूप बदलत जाताना दिसते. मला इथंच आणि असंच राहणं आवडतं कारण माझ्यावर कोणी हे जगणं लादलेलं नाही ते मी स्वत:हून स्वीकारलेलं आहे. [४] आपल्या निरिच्छ जगण्याबद्दल सर्वच लोक नेहमी दुस-यांवर दोषारोप करत असताना त्या अनामिकाने आपल्या जगण्याच्या स्वातंत्र्याबद्दल केलेले विधान त्याचा जीवनदृष्टिकोन सूचित करते. दिसतं खूप आपणाला पण आपण ते सारेच पाहात नाही... आणि आपण यापैकी आजही जर म्हाताराक्ररोगीक्रप्रेतक्रदरिद्री पाहिला तर घर सोडून जाऊ [५] दिसणं आणि पाहणं यातील नैसरने स्पष्ट केलेले अंतर किंवा आपल्या शिलातक्षात शिकवले जाणारे नृत्याचे धडे संपले, की नृत्यकला पूर्ण झाली काय [६] शिलातक्ष प्रमुखाला उद्देशून संपूर्ण ताकदीने पूर्ण जाणिवेच्या पातळीवरून सनृताने विचारलेला प्रश्न त्या त्या पात्राचा वैचारिक प्रवास दर्शवणारा आहे. पात्रांच्या संवादातून विविधता जाणवते, यातून त्यांचा स्वभाव, दृष्टिकोन, वर्तन अनेक अर्थच्छटा व्यक्त होतात त्यामुळे कथेला एक परिणामक्षम जिवंतपणा लाभतो.

परिव्राजक ची भाषा मनाचा वेध घेणारी असल्याने ती जवळची वाटते. वाचकांच्या हृदयाचा ठाव घेते. अनुकूल शब्दांची समर्पक मांडणी केल्यामुळेच वातावरणनिर्मिती परिणामकारक बनते. तात्त्विक कूट, काव्यमय तसेच मोडतोड केलेली नवी

 ISSN:-2347-2723

शैली, शब्दकळा, भाषारूपे अभिव्यक्त होताना लेखकाची जागृकता, सामर्थ्य यांचा प्रत्यय येतो. त्यांची खास स्वत:ची अशी लेखनशैली व शब्दकळा यांचे प्रतिबिंब पानापानांत दिसून येते. तसेच आशयानुरूप काव्याचा वापर केल्याचे जाणवते. उदा. शिल्पासन [७] कथेत तेजसनने चित्राला उद्देशून लिहिलेल्या मजकूरातील काव्य हे कलाकृतीला नवी दृष्टी देवून जाते. तसेच कथा या कथेतील थेरड्या [८] या शिवीतून संताप व्यक्त होतो.

संस्कृत व पालीगाथांचा कथेच्या अनुषंगाने केलेला उपयोग मोठा अन्वर्थक आहे. दोन कालवडींचा बळी देण्याच्या रात्री ऋत्विजचा मंत्रोच्चार दैव्य शमितार [९] किंवा शोध सहाव्या इंद्रियाचा या कथेत नृत्याच्या अनुषंगाने आलेली विधाने अंगिकं भुवनं यस्य! आणि नृत्यमयं जगत! [१०] हे संदर्भ वातावरणाचे गांभिर्य निदर्शनास आणून देतात. यासोबत पालीगाथांचे संदर्भ देखील आपले लक्ष वेधतात. आपल्याला उन्नत, प्रसन्न बनवतात. वंदन व सद्‌भावना व्यक्त करताना आलेले वंदामि भन्ते!, भवतु सब्ब मंगलम [११] हे संदर्भ किंवा हिंसा आणि अहिंसेच्या वैचारिक संघर्षात हिंसेचा पराभव दाखवताना आलेला अत्तदण्ड [१२] सुत्तातील अंश, हे संदर्भ बौद्ध संस्कृती, मूल्यांकडे आपले लक्ष वेधतात. नहि वेरेन वेरानि [१३] हा स्तंभावरील लेख आपल्या प्रज्ञेने सत्य जाणणारे अर्हत मोठयाने वाचतात. तर निकाय ला सुरा-मेरय-मज्ज-पमादठाना [१४] सारखे आठवत राहते. पाली गाथांना मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व असल्याने हे संदर्भ आपले लक्ष वेधतात, वाचकाला विचारप्रवण बनवतात, सत्याच्या अधिक जवळ घेऊन जातात.

उपमांचा विचार करता तू एक गरूडाचं पिल्लू आहेस [१५] ही सनृताला उपमा दिली आहे. सगळे पक्षी जेथून जमिनीकडे परततात तेथून गरूडाची भरारी सुरू होते ही उंची दर्शविण्यासाठीच वरील उपमा एक वेगळा परिणाम साधते. यावरोबरच तडफडणारे मासे, फडफडणा-या दिव्याप्रमाणे बोलणे, गुलावपाकळी, नागफणा, महाकाय लाटा, नागिणीसारखे डुलणे, दुधी मोहोर, झाडांच्या फांद्या, चिंताग्रस्त झाडे इत्यादी निसर्ग व मानवी भाव-भावनात्मक प्रतिमा वापरून कथेतून उपमांचा केलेला समर्प क वापर नवी दिशा देतो.

फुले-आंबेडकरी साहित्याने प्रतिमा प्रतीकांच्या माध्यमातूनही आपले वेगळेपण जपले आहे. हिंदू धर्म, धर्मग्रंथ, ग्रंथप्रामाण्य, यांचा प्रभाव असलेल्या पाप-पुण्य, प्रारब्ध-नशीब, मोक्ष-ईश्वर, सरस्वती, आत्मा, पुनर्जन्म, विष-अमृत, स्वर्ग-नर्क इत्यादी संकल्पनांना स्पष्टपणे नकार दिला आहे. तसेच पारंपरिक साहित्यातून येणा-या शंबुक, एकलव्य, राम-सीता, कृष्ण-कर्ण, अश्वत्थामा, या पुराण नायकांच्या प्रतिमांनाही त्याज्य ठरविले आहे. गौतमीपुत्रांनी आपल्या कथेतून मानवी भाव-भावना तारूण्य, सद्‌गुण, कला, परिसर, स्वातंत्र्य इत्यादी बाबींशी निगडीत प्रतिमांचा वापर केला आहे.

राग, संयम, आपुलकी, जिव्हाळा, अपराधीपणा, निरवता, क्रुरता, निष्ठूरता, अस्वस्थतता, भयावहता, रितेपण, मौन या मानवी भाव-भावना प्रतिमांच्या माध्यमातून मांडल्या आहेत. तर दगड, पशू, परंपरा, वाळवंट, काचेची भिंत, सडक, अंगण, सावली, सायंकाळ, मरणकळा यातून मानवी वृत्ती-प्रवृत्तीवर प्रकाशझोत टाकला आहे. तसेच दगडी मूर्ती, शिल्प, सूर्य, पूर्ण चंद्र, प्रकाश या बौद्ध संस्कृतीतील प्रतिमांचा यथोचित वापर केला आहे.

प्रतीकांचा विचार करताना परिव्राजक कथेतील चार पायाचा माणूस पशूत्वाचे प्रतीक आहे. विरूपनगरी या कथेतील प्राचीन कथा, ऋत्विज, अनघड पाषाण, मैदान तसेच शोध सहाव्या इंद्रियाचा या कथेतील अनेक जातीयवादी शिक्षक हे रूढी, परंपरा, कर्मकांड करणा-या प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून कथेत येतात. कथा या कथेतील गुहेतील तो आणि कथाकार हे नवनिर्मितीचे प्रतीक आहेत. तर परिव्राजक या कथेतील दगडी मूर्ती, म्हाता-याच्या हातातील राजदंड, पावसाळयातील पूर्ण चंद्राची रात्र, विरूपनगरी तील कोरीव दगडी स्तंभ, अक्षरे, बौद्ध लेण्या, अर्हत, सूर्याची प्रतिमा या सर्व बौद्ध तत्वज्ञान व संस्कृतीच्या बोलवित्या खुणा आहेत.

ज्या सिद्धांतांना वास्तवतेचा अनुभवाचा आधार नाही, जी केवळ काल्पनिक अनुमाने आहेत. अशा सिद्धांतांना, प्रतिमा-प्रतीकांना गौतमीपुत्रांनी स्पष्टपणे नाकारले आहे. कथेच्या सुरवातीस लांब पल्लेदार, दीर्घ वाक्यरचना आढळते तर शेवटांकडे जाताना मात्र आटोपशीर वाक्यरचना आढळते. प्रयोगशीलता, वस्तूनिष्ठता, सत्यशोधकता, मूल्यात्मक वैचारिकता, तत्त्वज्ञानगर्भ भाषा, हे परिव्राजक चे भाषाविशेष ध्यानात घ्यावे लागतील. तसेच भाषेतील शब्द, वाक्य व अर्थ त्यामागील ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, तत्त्वज्ञानात्मक पर्यावरण समजून घेणे गरजेचे आहे.

स्थळकाळाशी संबंध तोडून एक कालातीत विश्व उभारण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून गौतमीपुत्रांनी कथेची नवी भाषाही घडवण्याचा प्रयत्न केला आहे. [१६] वरील बाबी ध्यानात घेतल्या तर काही लोकांना भाषेत ओबड-धोबडपणा जाणवत

असला तरी अत्यंत अनुरूप, समर्थ भाषा वापरून मराठी कथेच्या भाषा वापराची कक्षा विस्तारून मराठी साहित्य भाषेत गौतमीपुत्र कांबळे यांनी लक्षणीय भर घातली असेच म्हणावे लागेल.

## संदर्भसूची

१. नेमाडे भालचंद्र : साहित्याची भाषा , साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती १९९८, पृष्ठ क्र. १६
२. कांबळे गौतमीपुत्र : परिव्राजक , एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, प्रथमावृत्ती सप्टेंबर २००४, पृष्ठ क्र. १०६
३. तत्रैव : पृष्ठ क्र. १४२-१४३
४. तत्रैव : पृष्ठ क्र. २९
५. तत्रैव : पृष्ठ क्र. ५८
६. तत्रैव : पृष्ठ क्र. ७६
७. तत्रैव : पृष्ठ क्र. ८२-८३
८. तत्रैव : पृष्ठ क्र. ३२
९. तत्रैव : पृष्ठ क्र. ११७-११८
१०. तत्रैव : पृष्ठ क्र. १६०
११. तत्रैव : पृष्ठ क्र. १०९
१२. तत्रैव : पृष्ठ क्र. १२५-१२६
१३. तत्रैव : पृष्ठ क्र. १२६
१४. तत्रैव : पृष्ठ क्र. १४१
१५. तत्रैव : पृष्ठ क्र. ८२
१६. रिंढे नितिन : नव्या वाटा धुंडाळणारा लेखक , सकाळ , मुंबई, मेट्रो, ४ फेब्रुवारी २००६, पृष्ठ क्र. १०